RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ४०] मंगळवार, एप्रिल ३, २०१८/चैत्र १३, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ एप्रिल २०१८

### अधिसूचना

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र. ०३/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र ४१) च्या कलम ३२८, च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चे खंड (चार), (दहा), (चौदा) व (त्रेसष्ठ) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास समर्थ असणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजिले आहे, त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासन, दिनांक२ मे २०१८ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.

२. शासनाचे प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), महसूल व वन विभाग, पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे वरील दिनांकापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### नियमांचा मसुदा

(१) या नियमांना, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) (सुधारणा) नियम, २०१८ असे म्हणावे.

(२) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ११ नंतर पुढीलप्रमाणे नियम ११अ नव्याने समाविष्ट करण्यात येत आहे :—

" **नियम ११अ**.—पुर्ववर्ती नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु नियम १२ मधील तरतुदीस अधिन राहून, भारतीय सैन्यदलात, किंवा सशस्त्र दलामध्ये कार्यरत असणाऱ्या आणि या राज्यातील अधिवासी असणाऱ्या जवानास अथवा अधिकाऱ्यास कोणत्याही युद्धात किंवा युद्धजन्य परिस्थितीत किंवा कोणत्याही लष्करी कारवाईत वीरमरण आल्यास, अशा जवानाच्या अथवा अधिकाऱ्याच्या विधवा पत्नीस किंवा त्यांच्या कायदेशीर वारसास निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली नेमून देण्यायोग्य जमीन, कृषी प्रयोजनासाठी, भोगाधिकार मुल्य रहित, विना लिलाव प्रदान करण्यास जिल्हाधिकारी सक्षम राहतील. अशा सैन्यदलातील, किंवा सशस्त्र दलातील जवान अथवा अधिकाऱ्याच्या विधवा पत्नीस किंवा त्यांच्या कायदेशीर वारसास याप्रमाणे जमीन प्रदान करताना उत्पन्नाची मर्यादा आवश्यक राहणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**

शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 3rd April 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2018/C.R. 03/J-1.—The following draft of rules further to amend the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (1) and clauses (*iv*), (*x*), (*xiv*) and (*lxiii*) of sub-section (*2*) of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after 2nd May 2018.

2. Any objection or suggestion, which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

(*1*) These rules may be called the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) (Amendment) Rules, 2018.

(*2*) After rule 11 of the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, the following rule shall be inserted, namely :—

"**11A.** Notwithstanding anything contained in these Rules, but subject to the provisions of rule 12, the Collector shall be competent to allot the unoccupied allotable land for agricultural purpose, free of occupancy price, without auction, to the widow or legal heir of such soldier or officer of armed forces or paramilitary forces, who had been domiciled in the State and had attained martyrdom during any war or warlike situation or any such action. While making such allotment of land, there will be no income limit for widow or legal heir of such soldier or officer of armed forces or paramilitary forces."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.